अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर



## कुंभारी येथे विहिरीत इसमाचा मृतदेह आढळला

✔ सोलापूर/प्रतिनिधी

कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील एका विहिरीत ५० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही घटना सोमवारी सकाळच्या सुमारात उघडकीस आली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वळसंगच्या पोलिसांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. मृतदेह सोलापुरातील शासकीय रुग्णालयाकडे उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली. हवालदार कुंवर तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### सफाई अपनाओ बिमारी भघाव' या मोहिमेअंतर्गत स्वच्छता मोहीम

✔ **सोलापूर** : शासनाच्या 'सफाई अपनाओ बिमारी भगाव' या मोहिमेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील प्रभाग क्र. ४२ परिसरातील पाटीलनगर, नई जिंदगी प्राथमिक आरोग्य केंद्र, आसरा चौक आदी भागात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. मोहिमेअंतर्गत नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी आपापला परिसर स्वच्छ, सुंदर ठेवून घनकचरा व्यवस्थापन विभागास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य आरोग्य अधिकारी निरीक्षक मंजुनाथ बागेवाडीकर यांनी केले.यावेळी आरोग्य निरीक्षक श्रीशैल हिंगमिरे, वंदना कांबळे, शीलरत्न दुड्डे, पवन वाघमारे, शेषराव शिरसट, सदाशिव पुजारी, शिवप्रसाद कुलकर्णी, वाहिद पिरमोपल्ली, विजय साळुंखे, सुनील भालेराव यांच्यासह जमादार, बिगारी, झाडूवाला - झाडूवाली घंटागाडी बिगारी उपस्थित होते.



### मागण्या पुर्ण होण्यासाठी सोलापुरात महादेव कोळी समाज आक्रमक

✔ **सोलापूर** : महादेव कोळी समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात सोमवारी (दि.८) सोलापूर येथे महादेव कोळी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल तहसीलदार दिनेश पारगे यांना निवेदन देण्यात आले.मागण्या मान्य न झाल्यास मुख्यमंत्र्यांना आषाढी एकादशीची पुजा करु देणार नसल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. सोमवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास सोलापूर जिल्हा परिषद पुनम गेट समोरुन नवीन जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महादेव कोळी बांधवांनी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल तहसिलदार दिनेश पारगे यांना समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. नेते सुरज खडाखडे, सामाजिक कार्यकर्ते सुदाम होनकोंबडे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच आदिवासी समाजातील २५ आमदारांवर जोरदार टीका केली.यावेळी तात्यासाहेब भंडारे, शंकर कोळी, बाबासाहेब सोनवणे, राम शिंदे, दत्तात्रय कोळी, आकाश जमादार तसेच महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी समाजातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

### शिंगोली येथे महिलेस रात्री काठीने केली मारहाण; महिला जखमी

✔ **सोलापूर** : शिंगोली (ता.मोहोळ) येथे गावात राहू नको, असे म्हणून काठीने केलेल्या मारहाणीत कीर्ती गायकवाड (वय २६) ही महिला जखमी झाली. ही घटना रविवारी (दि. ७) रात्रीच्या सुमारास त्यांच्या घराजवळ घडली. त्यांना प्रशांत कस्तुरे याच्याशी का बोलते, तू गावात राहू नकोस असे म्हणून शेजारी राहणारे बाळू कस्तुरे आणि इतर तिघांनी मिळून मारहाण केली. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## महिन्याच्या ७ ते १५ तारखेला मिळेल रेशनमध्ये धान्य

### अन्न धान्य वितरण अधिकारी पडोळे यांची माहिती

✔ **सोलापूर** : सोलापुरात आता प्रत्येक महिन्याच्या ७ ते १५ तारखेपर्यंत रेशनमध्ये धान्य वाटप करणार असल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

अन्न सुरक्षा दिनाचा मुख्य उद्देश लोकांमध्ये जागरूकता पसरवणे, स्वच्छ खाण्याची सवय व्हावी यासाठी प्रेरित करणे हा आहे. या अनुषंगाने सोलापूर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सोलापूर शहरातील दुकानदारांची बैठक बोलावून अन्न सप्ताह दिनाचे महत्व सांगितले. त्या मुद्यांना अंमलात आणण्यासाठी सक्त सूचना दुकानदारांना दिल्या. दुकानदारानी जुलै महिन्यापासून अन्न सप्ताह दिनाचे औचित्य साधून वाटपास सुरुवात केली असून नागरिकांचा देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या संकल्पनेतून ई केवायसी मोहिमेबाबतीत शिबीर दुकानदार संघटनेच्या वतीने यशस्वीरित्या पार पडली आहे. नागरिकांनी महिन्याच्या सुरुवातीलाच वेळेत धान्य मिळत असल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे. ही योजना संपूर्ण राज्यात फक्त सोलापूर शहरातच प्रभावीपणे राबवत आहे. दि. ७ ते १५ तारखेदरम्यान धान्य वाटप तसेच दिनांक १६ ते ३० तारखेपर्यंत पुन्हा ई केवायसी मोहिम राबविणार असल्याचे जिल्हाप्रमुख नितीन पेंटर यांनी सांगितले.



# रेल्वे लोहमार्ग पोलिसांची गुन्हेगारांवर करडी नजर

## स्थानकासह एक्स्प्रेसमधील बारीक-सारीक घटनांवर लक्ष

### ▶▶ १४ पोलीस ठाण्यांतर्गत सुरक्षित प्रवासाची दक्षता ▶▶ वर्षभरात ६७ गुन्हे उघडकीस;८० गुन्हेगारांना शिक्षा

✔ सोलापूर/दीपक शिराळकर

**रेल्वे प्रवाशांचा अधिकाधिक सुरक्षित प्रवास व्हावा, यासाठी लोहमार्ग पोलीस अधिक सतर्क होताहेत. सोलापूर रेल्वे स्थानकासह एक्स्प्रेस अन्य गाड्यांमधील बारीक-सारीक घटनांवर लोहमार्ग पोलीसांचे लक्ष आहे. सोलापूर रेल्वे विभागातील १४ पोलीस ठाण्यांतर्गत कायदा व सुव्यवस्था पाहिली जात असून गुन्हेगारांवर करडी नजर ठेवून प्रवाशांच्या सुरक्षितेची काळजी घेतली जात आहे. २०२३-२०२४ या वर्षभराच्या काळात ६७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून ८० गुन्हेगारांना शिक्षा लावण्याची कामगिरी सोलापूर लोहमार्ग पोलीस विभागानं केली आहे.**

सोलापूर लोहमार्ग पोलीस रेल्वेतील गैरप्रकार रोखण्यासाठी लोहमार्ग पोलीस आपली ड्युटी बजावत असतात.सोलापूर विभागात १४ लोहमार्ग पोलीस ठाणे आहेत. अनेक रेल्वे स्थानकात रोज काय तर घडत असते. स्थानक परिसरात घडणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष लोहमार्ग पोलीस ठेवत असते. रेल्वेने गोर- गरीब श्रीमंत प्रवास करत असतात. प्रवास करत अनेकवेळा प्रवाशांचे दागिने, मोबाईल, चैन, पाकिट,लॅपटॉप वगैरे मौल्यवान वस्तू चोरीला जातात.

अथवा गहाळ होतात. अशा गहाळ वा चोरी झालेल्या वस्तूंना शोधून लोहमार्ग पोलीस त्या परत करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात.




#### २०२३-२०२४ मधील गुन्ह्यांचा तपशील

- मोबाईल चोरी १०३
- बॅक चोरी ९०
- चैन चोरी २१
- इतर चोरी ९६
- एकूण चोरी ३००
- उघडकीस ६७

#### लोहमार्ग पोलीस ठाणे सतर्क

सोलापूरच लोहमार्ग पोलिसांच्या अंतर्गत १४ पोलीस ठाणे कार्यरत असून, लोहमार्ग पोलीस डोळ्यातील घालुनी अहोरात्र काम करीत आहेत. ५४ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.

#### रेल्वे प्रवासात वस्तू सांभाळून ठेवाव्यात

शक्यतो मौल्यवान वस्तू रेल्वे प्रवासात सोबत बाळगू नयेत. रेल्वे प्रवासात काही संसहित वाटल्यास तात्काळ पोलिसांची मदत घ्यावी किंवा सदरची बाब टीसी यांना निदर्शनास आणून द्यावे तसेच रेल्वे हेल्पलाइन १५१२ किंवा आरपीएफ हेल्पलाइन १३९ या नंबर वर संपर्क साधावा.

**-संतोष गायकवाड**
**(पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पोलीस, मध्य रेल्वे सोलापूर)**

#### लोहमार्ग पोलिसांचे चौख पेट्रोलिंग

१४ लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या जाणाऱ्या रेल्वे मध्ये पेट्रोलिंग करण्यासाठी बंदूकधारी २ अंमलदार रेल्वे डब्यात ड्युटी बजावत असतात. क्रॉसिंग च्या वेळी पोलीस सर्तक असतात.

#### लोहमार्ग पोलिसांची करडी नजर

सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सोलापूर विभागात एकूण ४० कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून आम्हाला मदत होते.

#### लगेच सापडू शकतो गुन्हेगार सापडू शकतो.

२०२३- २४ जास्त गुन्हेगारांना शिक्षा लोहमार्ग पोलिसांच्या अंतर्गत आतापर्यंत जास्तीत जास्त गुन्हेगारांच्या मुस्क्या आवळण्यात आलेल्या आहेत. लोहमार्ग पोलिसांनी आतापर्यंत ८० गुन्हेगारांना शिक्षा लावण्यात यश प्राप्त केले आहे.

# भजनावळे यांना शासकीय दराप्रमाणे नुकसान भरपाई मिळणार का?

## महावितरण आणि प्रशासनाकडेमध्ये घोळ

✔ सोलापूर/प्रतिनिधी

उत्तर तालुक्यातील गुळवंची येथील विष्णू भजनावळे यांच्या १७ मोठी म्हशी २ रेड्यांचा ओढ्यात गेल्या असता विजेचा शॉक लागून मृत्यु झाला होता. याप्रकरणी त्यांना शासकिय दराप्रमाणे नुकसान भरपाई मिळणार का असा प्रश्न विचारला जात आहे.

भजनावळे यांचा वडिलोपार्जित म्हैस पालन दूध व्यवसाय आहे. सर्व म्हशी पंढरपुरी होत्या. आमदार यशवंत माने यांनी त्यांना बाजारभावा प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

एका म्हशींची किंमत त्यावेळच्या दराने की आताच्या दराने दिली जाणार याचा घोळ महावितरण आणि प्रशासनाकडेकडे रखडला आहे. शासनाच्या दुधाळ गाय व म्हैस योजनेच्या आदेशानुसार एका म्हशींची किंमत ४० हजार रुपये होती. आताची किंमत लाखाच्यावर आहे. एकूण १९ पैकी १७ दुभत्या आणि २ रेड्या मृत्युमुखी पडल्या आहेत.

### दोन्ही विभागांच्या भुमिकांवर नुकसान भरपाईचा निर्णय

**१) महावितरण :** पंचनामानुसार दुभत्या १७, रेड्या २ अशी १९ म्हशी होत्या. महावितरणच्या नियमानुसार घटनेचा अहवाल, वय, बाजारभाव इतर तपासणी होऊन प्रस्ताव पुढे पाठवला जातो. जबाबदारी ग्राह्य धरूनच नुकसान भरपाई दिली जाते, असे उत्तर सोलापूरचे महावितरणचे अभियंता मुल्ला यांनी सांगितले.

**२) प्रशासन :** महावितरण विभागाने घटनेची जबाबदारी घेतली तर,अंतिम अहवालामध्ये काय उल्लेख आहे त्यानुसार नुकसान भरपाईची कार्यवाही होऊ शकते, असे पशुधन विकास अधिकारी प्रशांत देशमुख यांनी म्हटले आहे.

## भजनावळे कुटुंबियांस ८५ हजाराची मदत

गुळवंची (ता. उत्तर सोलापूर) येथील विष्णू भजनावळे यांच्या २४ म्हशींचा ओढ्यातील पाण्यात करंट उतरल्याने मृत्यू ४ जुलै रोजी झाला होता. त्यापार्श्वभुमीवर खा. प्रणिती शिंदे व आ. यशवंत माने तसेच राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यावतीने एकुण ८५ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. संबंधित घटनेत भजनावळे यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले होते. एक सामाजीक कर्तव्य म्हणून खा. प्रणिती शिंदे यांनी ५० हजार, मोहोळचे आमदार यशवंत माने ह्यांनी रोख २५ हजार,यश फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उत्तर तालुका अध्यक्ष प्रल्हाद काशीद यांनी रोख १०००० ह्यांनी मदत केली.यावेळी उत्तर सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. मदत दिल्याने भजनावळे कुटुंबियांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते.



भजनावळे कुटुंबास यांना रोख मदत करताना खासदार प्रणिती शिंदे आदी.

# वारस प्रमाणपत्राचा उपयोग काय?

# 'असं' सर्टिफिकेट वारसांना घ्यावेच लागेल का?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मालमत्तेच्या वारसासाठी, कायदेशीर वारस प्रमाणपत्र अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कुटुंबातील मृत सदस्याच्या मालमत्तेचा वारसा मिळण्यासाठी, त्याच्या कायदेशीर वारसांना दोन महत्त्वपूर्ण कागदपत्रे सादर करावी लागतात मृत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र आणि मालकाच्या मालमत्तेचा वारसा मिळण्यास पात्र असलेल्या जिवंत सदस्यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र. वारस प्रमाणापत्राच्या संदर्भात दैनिक 'सुराज्य'नं आपल्या वाचकांसाठी घेतलेला हा धांडोळा....**

माहितीचा खजिना
सुराज्य
InforMative

### कायदेशीर वारस प्रमाणपत्र म्हणजे काय?

एखाद्या कुटुंबातील कायदेशीर प्रमुखाचे निधन झाल्यास, त्याच्या कायदेशीर वारसांनी प्रथम या घटनेची तक्रार संबंधित अधिकाऱ्यांना करावी आणि मृत्यू प्रमाणपत्र ताबडतोब मिळवावे.मृत व्यक्तीचे सर्व हक्क आणि दायित्वे आता मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांमध्ये हस्तांतरित आणि वितरीत केली जाणार असल्याने, वारसा प्रक्रिया सुरू करण्यासाठी नंतरच्या व्यक्तीला कायदेशीर वारस प्रमाणपत्रासाठी देखील अर्ज करावा लागेल, ज्याला 'हयातीचे प्रमाणपत्र' देखील म्हटले जाते. कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे एक दस्तऐवज आहे ज्यामध्ये कायदेशीर अंमलबजावणीक्षमता आहे आणि मृत व्यक्ती आणि त्याच्या कायदेशीर वारसांमधील संबंध सांगते. हा 'मृत्युोत्तर' दस्तऐवज, ज्यामध्ये मृत व्यक्तीच्या सर्व कायदेशीर वारसांची नावे आहेत, हयात असलेल्या सदस्यांसाठी त्यांच्या मृत नातेवाइकाच्या मालमत्तेवर त्यांचा हक्क सांगण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कायदेशीर वारस प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी, अधिका-यांकडून मोठ्या प्रमाणावर परिश्रम आणि चौकशी केली जाते, हे समजण्यासारखे आहे.

### कायदेशीर वारस प्रमाणपत्राचा उपयोग काय?

- मृत व्यक्तीची जंगम आणि अचल मालमत्ता आणि संपत्ती हस्तांतरित करणे
- मृत व्यक्तीच्या विमा पॉलिसीच्या लाभांचा दावा करणे
- वाचलेल्यांच्या नावावर उपयुक्तता हस्तांतरित करणे
- मृत व्यक्तीचा उत्तराधिकारी म्हणून नोकरीचा दावा करणे
- मृत व्यक्तीच्या पगाराची थकबाकी प्राप्त करणे
- जर मृत व्यक्ती अजूनही नोकरीत असेल तर रोजगार लाभांचा दावा करण्यासाठी
- मृत व्यक्तीच्या भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युइटीवर दावा करणे
- मृत व्यक्तीच्या ठेवी, शिल्लक, गुंतवणूक, शेअर्स इ. हस्तांतरणासाठी
- मृत व्यक्तीच्या वतीने कर विवरणपत्र भरणे

### कायदेशीर वारस प्रमाणपत्रासाठी कोण अर्ज करू शकतो?

- मृताचा जोडीदार
- मृताची मुले (मुलगा व मुलगी)
- मृत व्यक्तीचे भावंडे (भाऊ आणि बहिणी)
- मृताचे पालक

### वर्ग दोन वारसानांही आता मिळू शकते वारस प्रमाणपत्र

वर्ग-२ वारसांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र जारी करण्यावर कोणताही प्रतिबंध नाही असे मद्रास उच्च न्यायाललयानं नुकत्याच दिलेल्या एका निर्णयात म्हटले आहे. वर्ग-२ च्या वारसाला कायदेशीर वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणताही अडथळा नाही. मृत व्यक्तीच्या वर्ग-२ वारसांमध्ये त्याचे वडील, नातवंडे, नातवंडे, भाऊ, बहीण आणि इतर नातेवाईकांचा समावेश होतो.